# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.१२.२०२४

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१४.११.२०२४ ते २०.१२.२०२४) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.१२.२०२४ ते २५.१२.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.५ | ३०.० | २९.८ | ३१.२ | ३०.२ | ३०.२ | ३१.० | कमाल तापमान (अं.से.) | | ३० | ३० | ३० | २९ | ३० |
| १३.५ | १२.५ | १२.२ | ११.५ | १२.२ | १३.२ | १५.० | किमान तापमान (अं.से.) | | १६ | १७ | १८ | १८ | २० |
| २ | १ | १ | २ | १ | १ | १ | स. | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | ३ | ३ | २ |
| १ | १ | १ | १ | ० | १ | ० | दु. | | | | | | |
| ८७ | ९१ | ९० | ९२ | ८७ | ८७ | ८३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८२ | ८१ | ८२ | ८१ | ८२ |
| ६५ | ६४ | ५४ | ७२ | ५० | ४४ | ४३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ४७ | ४८ | ४९ | ५० | ५१ |
| २.१ | २.२ | १.९ | २.१ | १.९ | ३.० | २.१ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | ३ | ३ | २ | ४ | ६ |
| आ. | पू. | आ. | आ. | पू. | नै. | आ. | स. | वाऱ्याची दिशा | पू.ई. | ई. | ई. | पू.ई. | पू. |
| पू. | आ. | पू. | पू. | आ. | पू.आ. | पू. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२४ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १४९१.१ | ९२ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २१ ते २५ डिसेंबर दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे.** कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २५ डिसेंबर पर्यंत कमाल तापमान २९.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान १६.० ते २०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८१ ते ८२% तर दुपारची सापेक्ष आद्रता ४७ ते ५१% दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०२ ते ०६ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक **२५ ते ३१ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त** तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये जमिनीतून बाष्पिभवन कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ गहू तसेच हरभरा या रब्बी पिकांना त्यांच्या संवेदनशील अवस्थांमध्ये व पिकांच्या आवश्यकतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| संदेश | | ➢ डिसेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ३.६३ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.१७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३३ मिनिटे चालववा. |
| गहू | कांडी धरणे | ➢ गहू पिकावर पेरणीनंतर ५५ दिवसांनी १९:१९:१९ या विद्राव्य खताची २ % (२०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ हरभरा हे पिक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास पिक उभळते त्यामुळे उत्पादनात मोठी घट येते. तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाला पाहिजे तेवढे आवश्यक त्या वेळेला पाणी देता येते, या पद्धतीमध्ये जमीन नेहमी भूसभुसित राहून कायम वाफसा राहिल्यामुळे खते, अन्नद्रव्ये पूर्णपणे उपलब्ध होतात व परिणामी उत्पादनात चांगली वाढ होते. त्यामुळे हरभरा पिकास पाणी देण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. |
| ऊस | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागवड करण्यासाठी को.८६०३२(नीरा), फुले २६५, फुले १०००१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले १३००७, को.९४०१२(फुले सावित्री), को. ९२००५ यापैकी एका वाणाची निवड करावी.<br>**बेणे प्रक्रिया:**<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर अ‍ॅसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| मिरची | फुलोरा | ➢ मिरची पिकावर काही ठिकाणी फुलकिडींचा प्रादुर्भाव दिसून आलेला आहे जैविक नियंत्रणासाठी व्हिेरिया बॅसियांना ५ ग्रॅम किंवा लेकॅनिसिलीयम लेकॅनि ५ ग्रॅम अधिक स्टीकर १ मिली प्रती लिटर पाणी याप्रमाणात फवारावे. |
| आंबा | मोहोर | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावर तुडतुडे कीड आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल.३ मिली + सल्फर ८० डब्ल्यूपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |

# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| भेंडी | फळ धारणा | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे भेंडी पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम **किंवा** हेक्झाकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ गायी-म्हशींच्या आहारात ज्वारी, गहू, मका यांसारख्या भरड धान्यांपासून तयार केलेला उच्च उर्जायुक्त आहार वापरा.<br>➢ किमान तापमानामध्ये घट होण्याची शक्यता असल्याने जनावरांचे गोठे उबदार ठेवणे गरजेचे आहे. विशेषतः वासरे, करडे व कोकरे यांच्या गोठ्यात रात्रीच्या वेळी तापमान उबदार ठेवावे व तापमान नियंत्रणासाठी गोठ्याच्या सर्व बाजूना पडदे लावावेत किंवा बारदाण्याच्या सहाय्याने काळजीपूर्वक बंद कराव्यात. |
| कुक्कुट पालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमानामध्ये १७.० अंश सेल्सिअस पर्यंत घट होण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घ्यावी |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

**ठिकाण : कोल्हापूर**

**दि. :** २०.१२.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**